# दि. २७/०८/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे

## इतिवृत्त

दिनांक २७.०८.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. सभापती महीला व बालकल्याण जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

1. मा. सौ. प्राजक्तताई मानकर, सभाध्यक्ष तथा सभापती म.व.बा.जिल्हा परिषद यवतमाळ
2. मा. श्री. प्रभाकरभाऊ उईके सभापती समाज कल्याण जि.प. यवतमाळ
3. सन्मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सदस्य जिल्हा परिषद यवतमाळ
4. सन्मा. श्री. वसंतभाऊ चंद्रे सदस्य जिल्हा परिषद यवतमाळ
5. सन्मा. सौ. संगीताताई राठोड सभापती पं.स. दिग्रस जि.प. यवतमाळ
6. सन्मा. सौ. कमलताई राठोड सदस्या जि.प. यवतमाळ
7. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
8. मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
9. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. मा. उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (म.ग्रा.रो.ह.यो.) जि.प. यवतमाळ
२. श्री. अमित आडे उपकार्यकारी अभियंता ग्रा. पा.पु. वि. यवतमाळ
३. श्री. अे.टी. पदमावार उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पुसद
४. श्री. के.एम. मानकर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
५. श्री. पी.पी. देशपांडे उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
६. श्री. व्हि. जे. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भु.सं.वि.य. यवतमाळ
७. श्री. संजय वानखडे कृ. अ. नरेगा जि.प. यवतमाळ
८. श्री. अ.ना. निसाळ उप कार्यकारी अभियंता सिंचन विभाग यवतमाळ
९. श्री. के. एम. मसादे उप का.अ. म.रा.वि.वि.कं. यवतमाळ
१०. श्री. प्रफुल अनंतराव पांडे स. अभि. महावितरण यवतमाळ
११. श्री. के. एन. आघाव शा.अ. पा.पु. उपविभाग दारव्हा
१२. श्री. नितिन के. शहाडे क.अभि. ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
१३. श्री. व्ही. आर. जाधव आरेखक ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ

१४. श्री.एच. एस. वाळके स.अ. राळेगाव
१५. श्री. एच. व्ही. बन्सोड क.अभि. ग्रा. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
१६. श्री. म.प्र. निरंजने स.ला.अ. यवतमाळ सा.प. वि. यवतमाळ
१७.श्री. पी. आर. कुरळकर क. अभि. (उपअभि. प्रभारी)ग्रा.पा.पु. वि. यवतमाळ
१८.श्री. पी. एस. जयस्वाल उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग वणी
१९. श्री. पी. एस. बन्सोड क.अभि. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
२०. कु. सोनाली शेंडे क.अभि. पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
२१. श्री. एम. एम. जोशी क.नि. आय. डी. वाय. यवतमाळ
२२. श्री. सी. बी. उत्तरवार तंत्र अधिकारी यवतमाळ
२३. श्री. पी. एल. मंडलीक जि.ग्रा.वि.यं. जि.प. यवतमाळ
२४. श्री. आर.के. पवार उपअभियंता यांत्रिकी यवतमाळ
२५. श्री. एस. एन. निलावार शा.अ. म.प्र.वि. यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरुवात केली.

**विषय क्र. १ :- दिनांक ०२/०८/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्र. १ :- दिनांक ०२/०८/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयाचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने खालील प्रमाणे सादर केला.

त्यानंतर कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी मागील सभेमध्ये मौ. वाढोणा खुर्द येथील योजनेला विद्युत जोडणी देणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना सांगण्यात आले होत परंतु अद्याप ही सदर योजनेला विद्युत जुळवणी मिळाली नसल्याचे सांगीतले.

यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधीने कार्यवाही सुरु आहे व आठ दिवसांमध्ये विद्युत जोडणी देण्यात येईल असे सांगीतले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी झरी तालुक्यातील शिबला येथील योजनेला अद्याप डिमांड प्राप्त झालेली नसल्याचे सांगीतले. यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधीने कार्यवाही सुरु आहे व पुढील आठ दिवसांमध्ये विद्युत जोडणी देण्यात येईल असे सांगीतले.

**विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत सुरु असलेल्या महागाव येथील वाढीव पाणी पुरवठा योजने बाबत माहीती विचारली असता का.अ. म.जी.प्रा. यांनी आता पर्यंत विद्युत जोडणी ची अडचण होती परंतु आता विद्युत जोडणी मिळाल्यामुळे सदर अडचण दुर झाली आहे. शक्य तेवढया लवकर कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. सभाध्यक्ष यांनी लवकरात लवकर कार्यवाही करणे बाबत निर्देश दिले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी मौ. ढाणकी ता. उमरखेड येथील नळ योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत घेणे बाबत मागील सभेत चर्चा झाली होती त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली यावर का.अ. म.जी.प्रा. यांनी सदर योजने करीता रु. ६ कोटी एवढा खर्च लागणार आहे त्यामुळे सदर प्रकरण मंत्रालय मुबई येथे मंजुरी करीता पाठवावे लागणार असल्याचे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी पुढील टंचाई चे आराखडयामध्ये सदर काम यायला पाहीजे असे सांगीतले.

**विषय क्र. ४:- संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१३-१४ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे ५०५८८२ एवढे एकूण उद्दीष्ट आहे. त्यापैकी APL चे २७९८९४ व BPL चे २२५९८८ एवढे उद्दीष्ट आहे. माहे जुन

२०१४ अखेर पर्यंत APL चे २२४७४१ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे ९४२२९ असे एकूण २२४७४१ एवढे वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण ४४ % काम पुर्ण झाले असल्याची माहीती दिली. यावर मा. सभाध्यक्ष यांनी सद्यस्थितीत कार्यशाळा कुठे कुठे सुरु आहे अशी विचारणा केली यावर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने बाभुळगाव व नेर येथे कार्यशाळा सुरु असल्याचे सांगीतले.

**विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ७१०८
२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ४६५२
३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - १२९९
४. कामे सुरु असलेल्या विहीरींचा संख्या - ३१०
५. पुर्ण झालेल्या विहीरींवरील झालेला एकूण खर्च - २०६८.२३

**विषय क्र. ६ :- पाणी पूरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत तालुका निहाय कामाची माहीती संबंधीत उपअभियंता यांनी खालील प्रमाणे सादर केली.

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखड्यामधील उद्दीष्ठीत ९५ गांवे व बिगर उद्दीष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ (Target ) | | २०१३-१४ (Non Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरू केलेली कामे | प्रस्तावित कामे | मंजुर कामे | |
| यवतमाळ | यवतमाळ | ४ | ४ | १४ | १३ | १२ |
| | आर्णी | १३ | १३ | ३ | ३ | ० |
| | बाभुळगांव | १ | १ | ९ | ८ | २ |
| **एकुण** | | **१८** | **१८** | **२६** | **२४** | १४ |
| दारव्हा | दारव्हा | १ | १ | ६ | ५ | २ |
| | नेर | २ | २ | ९ | ८ | २ |
| **एकुण** | | **३** | **३** | **१५** | **१३** | **४** |
| पांढरकवढा | पांढरकवडा | १ | १ | ३ | १ | १ |
| | घाटंजी | ६ | ६ | ३ | २ | १ |
| **एकुण** | | **७** | **७** | **६** | **५** | **०** |
| राळेगांव | राळेगांव | २ | २ | ५ | ८ | ३ |
| | कळंब | २ | २ | ११ | ७ | २ |
| **एकुण** | | **४** | **४** | **१६** | **१५** | **५** |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | ० |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ३ |
| | उमरखेड | ० | ० | ९ | ९ | ० |
| | महागांव | ० | ० | २ | २ | ० |
| **एकुण** | | **०** | **०** | **११** | **११** | **०** |
| वणी | वणी | १ | १ | ४ | ३ | ० |
| | मारेगांव | ५ | ५ | ५ | ३ | ० |
| | झरी | ४ | ४ | २ | ० | ० |
| **एकुण** | | **१०** | **१०** | **११** | **६** | **०** |
| **जिल्ह्याचे एकुण** | | **४२** | **४२** | **८५** | **७५** | **२३** |

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी यावर्षामध्ये किती सोलरपंप बसविले व महागाव मध्ये कीती बसविले या बाबत विचारणा केली असता श्री. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी या वर्षामध्ये एकूण ५४ सोलरपंप बसविले व उमरखेड मध्ये बारा येथे एक सोलरपंप बसविला असल्याचे सांगीतले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी फुलसावंगी व ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये पिण्याच्या पाण्याची अतिशय अडचण आहे, तेथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सुध्दा मागे येऊन गेले, त्यांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्रा मध्ये बोअर घेणे बाबत सुचना सुध्दा दिल्या होत्या परंतु आता पावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही किंवा वरिष्ठ भुवैज्ञानिक सुध्दा तेथे आलेले नाही असे सांगीतले. यावर श्री. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी NRHM चे अभियंता त्यांचे कडे आले होते. त्याचेकडे कामाचे प्लॅनींग सुध्दा करुन दिले होते. परंतु ते परत आले नाही. तसचे गाडी ची अडचण असल्यामुळे कामाचा सर्वे होऊ शकला नाही असे सांगीतले.

त्यानंतर मा. सभाध्यक्ष यांनी बिटरगाव येथे पाण्याची खुप अडचण आहे, तेथील पाण्याची पाईपलाईजीर्ण झालेली आहे. त्यामुळे पाईप लाईन मध्येच कुठेतरी फुटते व ग्रामस्थांना पाणी मिळत नाही यावर कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा पुसद यांनी एक ते दिड कीलो मिटर पाईप लाईन ला मान्यता मिळालेली आहे. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. सभाध्यक्ष यांनी सदर काम हे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत घेण्यात यावे असे सांगीतले.

त्यानंतर त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. वसंतभाऊ चंद्रे यांनी टंचाई मध्ये कीती बोअर झाल्या आहेत व उमरखेड मध्ये कीती घेण्यात आल्या आहे अशी विचारणा केली यावर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यांत्रिकी यांचे प्रतिनिधीने एकूण २६ बोअर झाल्या आहेत व उमरखेड मध्ये एकच गाव झाले असल्याचे सांगीतले.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ यांनी मौ. तरोडा ता. आर्णी येथील योजनेच्या कामाचे दोन हप्ते देण्यात आले आहे. रु. २० लक्ष चे काम झालेले आहे. स्लॅब बाकी आहे. परंतु पाणी नसल्या कारणाने ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन केले. संबंधित सन्मा. सदस्यांनी सदर काम करु नका असे सांगीतले आहे. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. सभाध्यक्ष यांना संबंधित सन्मा. सदस्यांना विश्वासात घेऊन सदर योजनेचे काम पुर्ण करुन घेणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मा. सभाध्यक्ष यांनी मौ. वाटखेड येथील योजनेच्या कामा बाबत विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग राळेगाव यांचे प्रतिनिधीने समिती ने सद्यस्थितीत शेतीचे काम सुरु आहे १५ दिवसात वाटखेड येथील योजना शेतात असल्यामुळे सद्यस्थितीत शेतामध्ये पेरणीची कामे सुरु आहे. त्यामुळे पुढील महीण्यात येथील काम करण्यात येईल असे सांगीतले होते परंतु आता समिती मागील हीशोब पुर्ण करुन दिल्या शिवाय सदर समिती काम करण्यास तयार नाही व सदर योजनेची उचल जास्त झालेली असल्याचे सांगीतले. यावर मा. अति.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर कामाचे मुल्यांकन करा व जास्त उचल करण्यात आली असेल तर FIR दाखल करा अश्या सुचना दिल्या.

त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पांढरकवडा हे सभेस उपस्थित नसल्यामुळे मा. सभाध्यक्ष यांनी पांढरकवडा उपविभागा अंतर्गत कामां बाबत अडचणी असल्यास कोणास विचारावे असा प्रश्न उपस्थित करुन तिव्र नाराजी व्यक्त केली.

**मा. अध्यक्ष, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्र. ७:- मौजे मोहदा ता. केळापूर येथील येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस प्रशासकीय मंजुरीबाबत.**

मौजे मोहदा ता. केळापूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे मुळ प्राकलन रु. ६४,६९,९००/- यांस मा. अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष, अमरावती यांचे पत्र क्र. भानिक/अम/तांशा/तांम/२५६/२०१४, दि. ७.०७.२०१४ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान आहे. मूळ योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ५०.०० लक्ष किंमतीच्या वर असलेले व दरडोई निकषातील स्वतंत्र/प्रादेशिक योजनांना मंजुरी देण्याचे अधिकारी जिल्हा व्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाच्या निकषात रु. ८९७.०० < २३२७.०० यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्येतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मानयता प्रदान करावी.

**ठराव क्र. २:- मौजे मोहदा ता. केळापूर येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र. ८:- मौजे कुंभा ता. मारेगांव येथील वाढीव नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. . .**

शासन निर्णय क्र. ग्रापाधो / २०१२-१३ / प्र.क्र. ३५ / पा. पु. -०७, दि. १६.०७.२०१३ नुसार सविनय सादर करण्यात येते की, मौजे कुंभा ता. मारेगांव जि. यवतमाळ येथील वाढीव नळ पाणी पुरवठा योजनेचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१३-१४ च्या कृती आराखड्यात अ. क्र. ५२ मध्ये नविन योजना म्हणून अंतर्भाव असून या कामास मा. अधिक्षक अभियंता, म.जि.प्रा.ना.व ग्रा योजना मंडळ, अमरावती यांनी तांत्रिक मान्यता प्रदान

केल्याबाबत पत्र क्र. भानिक /अम/तांशा/तांम/२५५/२०१४, दि. ७.०७.२०१४ नुसार कळविले आहे.

संदर्भिय शासन निर्णय क्र. ग्रापाधो / २०१२-१३ / प्र.क्र. ३५ / पा. पु. -०७, दि. १६.०७.२०१३ नुसार रु. ५०.०० लक्ष ते. रु. ५.०० कोटी पर्यंत किंमतीच्या योजनेस जिल्हा परिषदेच्या जिल्हा जलव्यवस्थापन समितीस मान्यता देण्याचे अधिकार प्रदान केलेले आहे. सदर योजना रु. ६९,३८,५००/- एवढ्या किंमतीची आहे. तांत्रिक मान्यतेची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

या योजनेचे वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| गावाची लोकसंख्या | - | २०११ - | २९६४ व्यक्ती |
| | | २०१५ - | ३०४२ व्यक्ती |
| प्रकल्पीत | - | २०३० - | ४५६३ व्यक्ती |
| योजनेचा दरडोई खर्च | - | रु. १५२०/- | |
| **योजनेतील समाविष्ठ उपांगे** | | | |
| विहिर | - | ६ x १२ मी. अस्तित्वातील विहिर | |
| उर्ध्वनलिका | - | PVC २३६० मी. लांबीची | |
| उंच टाकी | - | ४०,००० ली. १२ मी. उंच | |
| वितरण व्यवस्था | - | PVC ६.०३६ कि. मी. लांबी | |
| पंपीग मशिनरी | - | १०.०० पंप- २ नग | |
| विद्युत जोडणी | - | रोड क्रॉसिंग, पॅनल, स्विच रुम | |
| निव्वळ किंमत | - | रु. ६३,६६,६००/- | |
| ढोबळ किंमत | - | रु. ६९,३८,५००/- | |

उपरोक्त योजना राबविणारी यंत्रणा जि. प. पाणी पुरवठा विभाग असून योजना पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरूस्ती करीता ग्रा. पं. ला हस्तांतरीत करण्यात येईल.

उपरोक्त प्रस्ताव जिल्हा जलव्यवस्थापन समिती समोर प्रशासकीय मान्यतेस्तव ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी सादर केलेला आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे. तरी प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी. हि विनंती.

**ठराव क्र. ३:- मौजे कुंभा ता. मारेगांव येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. ९ :- मौजे चिखलगांव ता. वणी येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी बाबत.**

मौजे चिखलगांव ता. वणी येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे मुळ प्राकलन रु. १,४०,०७,८००/- यांस मा. कार्यकारी अभियंता, जि. प. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यवतमाळ यांचे आदेश क्र. २१३/पान क्र. १७५/यजिप/का.अ. पापुवि/तां/२०१४, दि. २५.०८.२०१४ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान आहे. मूळ योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ५०.०० लक्ष किंमतीच्या वर असलेले व दरडोई निकषातील स्वतंत्र/प्रादेशिक योजनांना मंजुरी देण्याचे अधिकारी जिल्हा व्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाच्या निकषात रु. ८८३.४४ < २३२७.०० यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्येतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मानयता प्रदान करावी.

**ठराव क्र. ४ :- मौजे चिखलगांव ता. वणी येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनास ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र. १० :-मौजे रुंझा ता. केळापूर येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस प्रशासकीय मंजुरीबाबत.**

मौजे रुझा ता. केळापूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे मुळ प्राकलन रु. ७०,०४,७००/- यांस मा. अभियंता,I, अमरावती यांचे पत्र क्र. भानिक /अम /तांशा /तांम /२५६ /२०१४, दि. ७.०७.२०१४ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान आहे. मूळ योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ५०.०० लक्ष किंमतीच्या वर असलेले व दरडोई निकषातील स्वतंत्र/प्रादेशिक योजनांना मंजुरी देण्याचे अधिकारी जिल्हा व्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाच्या निकषात रु. ८९७.०० < २३२७.०० यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्येतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीपुढे ठेवण्यात येत आहे. कृपया यास मानयता प्रदान करावी.

**ठराव क्र. ५:- मौजे रुंझा ता. केळापूर येथील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

**विषय क्र ११- सन २०१३-१४ वार्षिक प्रशासन अहवलास प्रशासकीय मंजुरात मिळणे बाबत.**

शासनाचे दिनांक ०६-०३-१९९७ चे आदेशान्वये जि.प.अंतर्गत पाणी पुरवठा विभागाची निर्मिती झाली. या विभागा अंतर्गत एकुण ६ उपविभाग आहेत. या विभागाकडुन रु. ५०.०० लाखा पर्यंतची नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे केली जातात तसेच विभागीय नळ योजनांची व पुर्ण झालेल्या परंतु अहस्तातरीत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. या व्यतीरीक्त या विभागाच्या अधिनस्त यांत्रीकी उपविभाग देण्यात आलेला आहे. या उपविभागाकडुन हातपंप, विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. तसेच भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे सहाय्यक भुवैज्ञानीक व कनिष्ठ भुवैज्ञानीक हयांची पाणी पुरवठा योजने करिता व विंधन विहीरीकरिता स्थळ निरीक्षण करुन उद्भव प्रमाणपत्र देण्या करिता जि.प. पाणी पुरवठा विभागा कडे नेमणुक झालेली आहे.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण व जिल्हा परीषदे कडुन करण्यात आलेल्या सन २०१३-१४ पर्यंत अस्तित्वातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा तपशिल.खालील प्रमाणे आहे

**(१)नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गावांची सख्या.**

| कायम स्वरुपी स्वतंत्र नळ योजना गावांची संख्या | तात्पुरती नळ योजना गावांची संख्या | विभागीय नळ योजना गावांची संख्या | एकुण नळ योजना गावांची संख्या |
|---|---|---|---|
| ११८१ | -- | ५५ (५) | १२३६ गावे (११८६योजना) |

**(२) नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या दुर्गम गावांची संख्या.**

अ) दुर्गम खेडयाची वर्षाच्या सुरुवातीची संख्या — **निरंक**

ब) दुर्गम खेडयाची वर्षाच्या अखेरची शिल्लक संख्या — **निरंक**

**(३) देखभाल व दुरुस्ती करीता भु.स.वि.य.उपविभागाकडील कामे**

अ) हातपप संख्या — **७८३७**

ब) विद्युतपप संख्या — **०२६३**

क) दुहेरी पंप — **००३८**

ड) सौर पंप — **००५४**

**(४) सार्वजीक पिण्याचे पाण्याच्या विहीरी**

अ) वर्षाच्या सुरुवातीस असलेल्या विहीरीची संख्या — **५३११ (९६ कॉलम प्रमाणे)**

ब) वर्षात बाधुन पुर्ण झालेल्या विहीरीची संख्या — **निरंक**

क) वर्षात दुरुस्त केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहीरीची संख्या — **निरंक**

**ठराव क्र- ६- सन २०१३-१४ वार्षिक प्रशासन अहवलास ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्र. १२ :- राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रम मौजे येळाबारा, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस प्रशासकीय मान्यतेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार मौजे मौजे येळाबारा, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे प्राकलन रु. ६७,१५,१२०/- यांस प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्याचे दृष्टीने प्रस्ताव जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीपुढे ठेवण्यात येत आहे.

मौजे येळाबारा, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमच्या सन २०१३-१४ च्या वार्षीक कृती आराखड्यात समावेश असुन सदर योजनेचे प्राकलन रु. ६७,१५,१२०/- यांस कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, यवतमाळ यांनी क्र. २१२ / १७५ / २०१४-१५, दि. २१.०८.२०१४ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र. १०४(अ)/पापु-०७, दि. १७ मार्च २०१० प्रमाणे स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करतांना ज्या योजनेची प्राकलीत रक्कम रू. ५०,००,०००/- पेक्षा जास्त आहे अश्या स्वतंत्र / प्रादेशिक योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहेत. परंतु सदरहु योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात असणे अनिवार्य आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात रु. १३१० < रु. २३२७ यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. ६:-** **राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रम मौजे येळाबारा, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस ही समिती प्रशासकीय मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थितांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्या बाबत मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी हयांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

P.Manankar...

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**सौ. प्राजक्ता मानकर**
**सभाध्यक्ष**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**